## नियमित दिवाणी दावा क्र-०१/२०१३
## निशाणी ७९ लगत

**शपथेवर उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. आर. चौधरी यांचे मार्फत -**

हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याचे कामकाज मागील तारखेपर्यंत माझे वडील नामदेव गिते हेच पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. २४.०२.२०२५ रोजी माझी आई शांताबाई नामदेव गिते ही नांदगाव येथे आली होती. हे म्हणणे खरे नाही की, तसेच माझा भाऊ मयत झाल्याने इतर नातेवाईकांकडे माझी आई गेलेली होती. दि. २४.०२.२०२५ रोजी माझी आई अॅ. रिंढे यांचे ऑफीसमध्ये आली होती. अॅ. रिंढे यांचे ऑफीस नांदगाव न्यायालयापासून अंदाजे २०० ते ५०० मीटरवर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई माझेसोबत जळगाव येथेच राहते. निशाणी ८० वरील कागद मला आता दाखविण्यात आला त्यावर नमूद केलेला माझ्या आईचा पत्ता बरोबर आहे. माझे आईला गुडघेदुखीचा व बी.पी. च्या विकाराचा त्रास आहे हे दाखविण्याकरीता मी आजपर्यंत डॉक्टरांचे प्रिस्क्रीप्शन किंवा सर्टिफिकेट दाखल केलेले नाही. माझे वडिलांना तीव्र हदयविकाराचा त्रास झाला असे दाखविण्याकरीता मी कोणतेही कागद दाखल केलेले नाही. माझे आई वडिल त्यांची दैनंदिन कामे स्वतः करतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई वडिल गावोगावी नांदगाव ते डोंबिवली कल्याण प्रवास करतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आई वडिलांची प्रकृती ठणठणीत आहे व त्यांना कोणताही विकार अथवा आजार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ खरी परिस्थिती न्यायालयासमक्ष येऊ नये म्हणून माझे आई वडिल न्यायालयात येत नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माझे स्वतःवर या न्यायालयामध्ये फौजदारी गुन्हा दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माझ्या आजोबाच्या मालकीची होती.

प्रश्न - तुमचे आजोबा तुळशीराम यांनी दावा मिळकत एकाच दिवशी माझी आई व काकू कलावती यांना खरेदीखताने दिली ?
उत्तर - मला दिली परंतु त्यांना दिली की कसे याची मला माहिती नाही.

खरेदीखत करताना मी होतो किंवा कसे हे आता मला आठवत नाही.
प्रश्न – दि. १९.०८.१९८० चे खरेदीखताने तुमच्या आजोबांनी तुमच्या आईचे नावे किती क्षेत्राची खरेदी दिली याची तुम्हाला माहिती आहे का ?
उत्तर – आरध्या क्षेत्राची खरेदी दिली.

पश्चिम दिशेचे क्षेत्र खरेदीखतामध्ये नमूद केलेले होते. त्या खरेदीखतावरुन गट नंबरमध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही. माझ्या आजोबांनी माझ्या आईला खरेदीखताने गट नं. ३२४ या गटाची खरेदी दिली. गट नं. ३२४ चा ७/१२ उतारा माझे आईच्या नावे आहे तो मी न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे.

**प्रतिवादीतर्फे निशाणी ८३ वर दिलेल्या अर्जाप्रमाणे पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
sd/-

(जे.एम.अग्निहोत्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदगाव

माझे समक्ष,
sd/-

(जे.एम.अग्निहोत्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदगाव

दिनांक - २४.०३.२०२५.